# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

**"आरोग्य भवन",सेंटजॉर्जेस रूग्णालयाचे आवार,**

**पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१**

| | | |
|---|---|---|
| **कार्यालय**<br>संचालक (वैयक्तिक )<br>सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | **दूरध्वनी**<br>२२६२१००६<br>२२६२०९२५ | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email : miscell@rediffmail.com<br>Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |


| | |
|---|---|
| आरोग्य सेवा | क्र.संआसे/कु.नि.श/गुणवत्ता/टे-१/कक्ष-१५/१४/२०१४<br>दिनांक : १८ नोव्हेंबर २०१४ |

**परिपत्रक**

विषयः **<u>राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम</u>**
कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतांना घ्यावयाची काळजी

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत राज्यात दरवर्षी सरासरी पाच लक्ष इतक्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात येतात. यामध्ये स्त्री शस्त्रक्रिया व पुरुष शस्त्रक्रिया यांचा समावेश असतो. स्त्री शस्त्रक्रियामध्ये बिनटाक्या शस्त्रक्रिया (Laparoscopy) व टाक्याच्या शस्त्रक्रिया (Minilap) यांचा समावेश आहे. आरोग्य संस्थांमध्ये सदर शस्त्रक्रिया ठराविक दिवशी (Fixed Day Service) अथवा शिबीर स्वरुपात करण्यात येतात हे आपणांस विदितच आहे.

नुकत्याच छत्तीसगड राज्यात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या बाबतीत घडलेल्या दुर्घटनेमध्ये कांही महिलांचा मृत्यु झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रामधून प्रसिध्द झालेल्या आहेत. या दुर्घटनेबाबतच्य वृत्तपत्रातील बातम्या पाहता सदर मृत्यु विहित मार्गदर्शक सुचनांचे पालन न केल्यामुळे झाल्याचे स्पष्ट होत आहे.

या संदर्भात वेळोवेळी विस्तृत सूचना देण्यात आल्या आहेत. छत्तीसगढ मध्ये झाली तशी दुर्घटना महाराष्ट्रात होऊ नये यासाठी या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. त्यासोबत खालील बाबींबाबत विशेष दक्षता घ्यावी.

(१) लाभार्थीची निवड योग्य प्रकारे करावी
(२) लाभार्थींची शस्त्रक्रियापूर्व तपासणी काळजीपूर्वक करावी
(३) शस्त्रक्रिया करण्यापूर्वी शल्यगृह निर्जतुक असल्याची खात्री करावी
(४) सर्व उपकरणे सुस्थितीत व निर्जतुक असल्याची खात्री करावी, कोणत्याही परिस्थितीत अस्वच्छ व निर्जतुक न केलेली उपकरणे वापरली जाणार नाहीत याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. सर्जनने शस्त्रक्रियागृह व उपकरणे निजर्तुक करण्याचे रेकॉर्डस तपासावे व ते योग्य आढळल्यावरच शस्त्रक्रियेला सुरुवात करावी.
(५) रुग्णासाठी प्रमाणीत औषधाचा वापर करावा. यासाठी राज्य स्तरावरुन पुरवठा केलेल्या औषधांचा वापर करावा आणि जर अत्यावश्यक प्रसंगी स्थानिक स्तरावर औषध खरेदी करावयाची गरज भासल्यास दर्जेदार उत्पादकांचीच औषधे खरेदी करावीत.
(६) शस्त्रक्रिया शिबिरातील लाभार्थ्यांची संख्या विहित मार्यादेपेक्षा जास्त ठेऊ नये

(७) शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची काळजी (Post operative care) योग्य प्रकारे घ्यावी व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करु नये. प्रत्येक रुग्णांस डिस्चार्ज देताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण तपासणी करुन तसे केस पेपरवर नोंदवावे.

(८) आरोग्य संस्थेमधील सर्वसाधारण दैनंदिन स्वच्छता चांगल्या प्रकारे ठेवावी आणि जैविक कचऱ्याची विल्हेवाट विहित पध्दतीने करावी

(९) कुटुंब नियोजन नुकसानभरपाई योजनेअंतर्गत दिनांक ९/५/२०१४ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेले संमतीपत्रके, शस्त्रक्रियापूर्व चेकलिस्ट इत्यादींचा काटेकोरपणे वापर करावा

(१०) जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीच्या नियमित सभा घ्याव्यात व त्यामध्ये कार्यक्रमाच्या गुणवत्तेविषयी आढावा घ्यावा

(११) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणारे सर्जन हे जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीने Empanelled केलेलेच असावेत तसेच खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करावयाची असल्यास सदर रुग्णालय हे मानांकित (Accredited) असणे आवश्यक आहे.

(१२) जिल्हयात विविध पातळीवर होणाऱ्या वैद्यकिय अधिक्षक, तालूका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांच्या आढावा सभांमध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रमाच्या गुणवत्तेचा नियमित आढावा घ्यावा.

(१३) जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांना व खाजगी मानांकित संस्थांना नियमितपणे भेटी द्याव्यात व तेथील गुणवत्ते विषयी आढावा घ्यावा.

(१४) रुग्णांची ने आण कोणत्याही परिस्थितीमध्ये मालवाहू वाहनांनी करु नये. असे आढळल्यास संबंधित वैद्यकीय अधिकारी व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांवर कायावाही करण्यात येईल.

(१५) सर्व बिनटाका शिबीरांसाठी जिल्हास्तरावरुन एक अधिकारी / वरिष्ठ पर्यवेक्षक निरिक्षक म्हणून हजर राहील याची दक्षता घ्यावी. या अधिकाऱ्यांनी शिबीराचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी आणि उपसंचालक यांना सादर करावा.

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे व शिबिरांचे आयोजन करणे याबाबत वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व याबाबत कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्यावी.

18/11/14

**संचालक आरोग्य सेवा**
**मुंबई**

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
वैद्यकिय अधिक्षक, स्त्री रुग्णालय (सर्व)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
प्राचार्य, सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर
प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (सर्व)

प्रतः उप संचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ (सर्व)

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागीय आढावा सभेमध्ये कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रमाच्या गुणवत्तेविषयी आढावा नियमितपणे घ्यावा.

प्रत अग्रेषितः
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) पुणे

प्रत सविनय सादरः
मा. आयुक्त (कु.क) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई
मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते. रुग्णालय, मुंबई